PVG's

# Muktangan English School & Jr. College, Pune - 9

## Unit Test II (2024-25)

## Standard - IX

**Subject - MARATHI** | **Marks - 20**
**Date - 27.01.2025** | **Time : 8.15 am to 9.30 am**


**विभाग १ - गद्य (गुण - १०)**

**प्रश्न १ (अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

आमच्या बंडूनानांना कुलपांचा मोठा शौक. अनेक धातूंची, अनेक आकारांची, अनेक कळींची कुलपे जमवून त्यांनी एक संग्रहालय बनवले आहे. घरात दूध-दुभत्याच्या कपाटापासून तो तहत पैशाच्या तिजोरीपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्यांनी कुलपे लावून नाकेबंदी करून टाकली आहे. घरावर एखादा डाका पडणार आहे अशी बातमी कळूनही कोणी इतकी तयारी करत नसेल! बरे, इतका बंदोबस्त करण्याचे कारण विचाराल, तर ते आपल्या चीजवस्तूंचे रक्षण व्हावे ही इच्छा नसून, कुलपांचा संग्रह मित्रमंडळींच्या नजरेस पडावा एवढीच आहे. या हव्यासामुळेच बंडूनानांनी काही कड्यांस दोन-दोन व काही दारांस दोन्ही बाजूंनी कुलपे लावलेली आहेत.

एवढा खटाटोप करून ठेवल्यामुळे बंडूनानांवर अनेक चमत्कारिक प्रसंगही आले आहेत. एकदा त्यांच्या धान्याच्या कोठीच्या कुलपाची किल्ली त्यांच्या कुटुंबाने हरवली. कुलूप जरा निराळ्या पद्धतीचे असल्यामुळे त्याला किल्ली शोधण्याकरता त्यांनी सगळा बाजार पालथा घातला, तरी किल्ली मिळेना! बरे, कुलूप लोहाराकडून काढवावे तर पोटच्या पोरापेक्षाही ममतेने वाढवलेल्या कुलपाची हाडे खिळखिळी होताना पाहणे हे बंडूनानांसारख्यांना जरा दुर्घटच होते. शिवाय गृहस्थ इतका मानी, की त्याने शेजाऱ्यांपाशी कधी पसाभर धान्यही उसने मागितले नव्हते.

**१) आकृतिबंध पूर्ण करा** **(१)**




**२) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**
धान्याच्या कोठीच्या कुलुपाची किल्ली कोणी हरवली ?

**३) कारण लिहा.** **(१)**
नानांनी शेजाऱ्यांपाशी पसाभर धान्य मागितले नाही कारण...

**४) स्वमत:** **(२)**
व्यक्तिमत्त्व विकासात छंदाचे असलेले महत्त्व लिहा.


**प्र. १ (ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

अलीकडच्या काळात विमाने आणि रडारयंत्रणामुळे सुद्धा पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी मोलाची माहिती मिळाली आहे. तरीसुद्धा पक्ष्यांच्या या गूढ सवयींसंबंधीची कित्येक रहस्ये अद्याप उकललेली नाहीत.


पक्ष्यांच्या स्थलांतराचे अनेक प्रकार पाडता येतील. हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात आणि उन्हाळ्यात परत वर सरकतात. त्यांचा एकूण प्रवास काही किलोमीटरचाच असतो. अनेकदा दुष्काळ, महापूर अथवा बर्फवृष्टीमुळे एखाद्या प्रांतात अन्न मिळेनासे झाले, की पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात. मुळात अन्नाचे दुर्भिक्ष हीच स्थलांतरामागची मूळ प्रेरणा आहे. पक्ष्यांना थंडीवाऱ्याची फारशी काळजी नसते. अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल, तर पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित जगू शकतात. एरवी दोन ते पाच हजार मीटर उंचीपर्यंत सापडणारे हिमकाक पक्षी एव्हरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे मागे साठेआठ हजार मीटर म्हणजे सुमारे सत्तावीस हजार फुटांपर्यंत आल्याची नोंद आहे. एवढ्या उंचीवर या पक्ष्यांना बर्फ, थंडी आणि हवेची कमी होत जाणारी घनता याचा कोणत्याही प्रकारे त्रास होत असलेला दिसत नाही. हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात ते थंडीमुळे नाही तर बर्फ पडून अन्न शोधणे कठीण झाल्यामुळे.

अनेक पक्षी असे आहेत, की जे बर्फ पडायला लागण्याच्या बरेच आधी, अन्न अद्यापही भरपूर उपलब्ध असतानाच आपल्या दक्षिणयात्रेला सुरुवात करतात.

१) (१)




२) (१)




३) **योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (१)

पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात,

कारण...

अ) एकाच ठिकाणी रहायचा कंटाळा आला की...

ब) अन्न मिळेनासे झाले की...

क) अन्नामध्ये वैविध्य नसले की...

ड) एकाच प्रकारचे अन्न खाल्ले की...

४) **स्वमत:** (२)

पक्षी स्थलांतर का करत असावेत यावर तुमचे मत लिहा.

## विभाग २ - पद्य (गुण - ५)

**प्र. २ खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**कविता – उजाड उघडे माळरानही**

स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा–दिशांना,
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा ।।१।।

गर्द पोपटी लेऊन वसने
मुरडत आली लिंबोणी,
जर्द तांबडी कर्णफुलेही
घालून सजली नागफणी।।२।।

लुसलुस पाने अंगोपांगी
झुले वड हा दंग होऊनी,
दुरंगी चुनरीत उभी ही
घाणेरी ही नटुनी थटुनी।।३।।

सळसळ झळझळ पिंपळ पाने
मऊ मुलायम मोरपिसापरी,
सांबर लाल कळ्यांनी लखडून
उभे स्वागता पाणंदीवरी ।।४।।

पळसफुले ही बहरून आली
या मातीच्या अंकावरती
कुसुमे सारी या जगातली
पाहून त्यांना मनात झुरती ।।५।।


आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान,
उजाड उघडे माळरानही
गाऊ लागले वसंतगान ।।६।।

**प्र.२ (अ) कारणे लिहा. (कोणतेही १)** **(१)**

१) कवयित्रीच्या मते दाही दिशांना रंग उधळले,
कारण...

२) जगातील सर्व फुले मनात झुरू लागली,
कारण...

**(आ) आकृतिबंध पूर्ण करा** **(२)**




**(इ) स्वमत -** **(२)**

सृष्टीचे सौंदर्य कायम राहण्यासाठी तुम्हांला सुचतील असे उपाय लिहा.

## विभाग ३ - स्थूलवाचन (गुण - २)

**प्र. ३ खालील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही १)** **(२)**

१) व्हेनिस म्हणजे हिऱ्या-माणकांच्या ढिगासारखा बेटांचा पुंजका...

२) व्हेनिस म्हणजे निरुद्योगी शहर...

## विभाग ४ - व्याकरण (गुण - ३)

**प्र. ४ (अ) खालील सामासिक शब्दांचा प्रकार ओळखा. (कोणतेही २)** **(१)**

१) यथाशक्ती –

२) रामलक्ष्मण –

३) चहापाणी –

**(आ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)** **(१)**

१) पाऊस –

२) श्वेत –

३) पक्षी –

**(इ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (कोणताही १)** **(१)**

१) हाडे खिळखिळी होणे –

२) दिसेनासे होणे –